वर्ष : १३ ❑ अंक : १०

सौर आश्विन, शके १९३६
(सप्टेंबर, २०१४)

वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान संतुलन

संपादक : दिलीप कुलकर्णी

**भूमिका**
'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही विकासनीती' ह्यांचा पुरस्कार करणारं, त्या दृष्टीनं विचार आणि कृति-कार्यक्रम पुढे ठेवणारं हे माध्यम आहे. आत्मपरिवर्तनाच्या ह्या प्रयत्नांत आपणही सहभागी व्हा आणि इतरांनाही सहभागी करून घ्या.

## मातीवर चढणे एक नवा थर अंतीं !

कुसुमाग्रजांची एक नितान्तसुंदर कविता आहे : 'मातीची दर्पोक्ती' नावाची. मानवाची सारी भौतिक निर्मिती अल्पकाळ टिकणारी आहे; एके दिवशी ती पार धुळीला मिळतेच मिळते, असं त्या कवितेत धूलिकण सांगतात. त्यातली काही कडवी इथे उद्धृत करावीशी वाटतात :

अभिमानी मानव आम्हाला अवमानी
बेहोष पाउले पडती अमुच्यावरुनी
त्या मत्त पदांना नच जाणीव अजूनी
की मार्ग शेवटी सर्व मातिला मिळती
मातीवर चढणे एक नवा थर अंतीं !
प्रासाद भिडू द्या गगनाला गर्वात
डोलु द्या पताका सत्तेच्या उन्मत्त
दौलती उठू द्या प्राशुनि दुर्बळ रक्त
कोसळेल इमला समूळ एका राती
मातीवर चढणे एक नवा थर अंतीं !
पाहून हसू ये तुमचे ताजमहाल
अन् गर्व किती तो! काल काय जिंकाल?
शेकडो ताजही जिथे शोभले काल
ती प्रचंड नगरे आज आमुच्या पोटीं
मातीवर चढणे एक नवा थर अंतीं !

खरं म्हणजे ही 'दर्पोक्ती' नाहीच : ती आहे 'स्पष्टोक्ती', किंवा 'यथार्थोक्ती' : माती उद्दामपणे किंवा गर्विष्ठपणे काही सांगत नाहीये; तर, जे निखळ वास्तव आहे ते ती स्पष्टपणे सांगतीये. मानवाच्या मनात असा भ्रम आहे की, आपण कृत्रिमरीत्या जे काही निर्माण केलंय, तो आपला 'निसर्गावरचा विजय' आहे. आपण ह्या 'विकासा'तून काहीतरी महान कार्य केलंय ह्याचा माणसाला गर्व आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेतले धूलिकण माणसाच्या ह्या भ्रमाचा भोपळा फोडतात; त्याचं गर्वहरण करतात. अहंकारी मानवाची जी काही निर्मिती आहे—भव्य असो वा क्षुद्र—ती एक ना एक दिवस अक्षरशः धुळीला मिळते; मातीच्या थराखाली गाडली जाते.

ह्या काव्याची आठवण होण्याचं कारण म्हणजे माळीण-दुर्घटना. जवळपास संपूर्ण गावावर असा एक मातीचा थर चढला. ही घटना एकमेवही नाही, अन् आजचीही नाही. 'मातीवर चढणे एक नवा थर अंतीं' हा प्रकार निसर्गात अधूनमधून चालूच असतो. भौतिकदृष्ट्या विकसित अशा मोहंजोदडो आणि हडप्पाच्या सभ्यता आणि नालंदाचं विद्यापीठही काही सहस्र वर्षांपूर्वी असंच मातीखाली गाडलं गेलं. सध्या जिथे उत्तर भारताचा पठारी प्रदेश आहे, तिथे लक्षावधी वर्षांपूर्वी समुद्र होता. धुपणाऱ्या हिमालयाचा गाळ साचून तोही नाहीसा झाला : तिथे आता जमीन आहे. इथे 'जमिनीनं समुद्र गिळला' म्हणावं, तर ठिकठिकाणी समुद्रानंही जमीन गिळंकृत केली आहे. त्सुनाम्या येतात नि किनारपट्टीवरचे भूभाग समुद्रात गडप होतात!

पृथ्वी आणि आपच नव्हे, तर पाचही महाभूतांच्या शक्ती इतक्या अफाट, अपरिमेय आहेत की, मानवानं आपल्या शक्तीची क्षुद्रता जाणून त्यांच्यापुढे भयनम्र व्हावं. त्यांची स्तुतिस्तोत्रं गावीत का; किंवा त्यांचा प्रकोप होऊ नये म्हणून प्रार्थना वा शांत करावी का, हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न आहे; पण, महाभूतांवर आपलं नियंत्रण नाही, हे मात्र माणसानं पुरतेपणी समजून असावं. 'निसर्गशरण' असण्यात कमीपणा काहीच नाही; उलट, त्यात वास्तवाची एक प्रगल्भ जाण आणि शहाणीव आहे.

म्हणजे मग माणसानं सभ्यतांची (civilizations) निर्मिती करायचीच नाही का? तसंही नाही. पण, ही निर्मिती करत असताना एकीकडे निसर्गाच्या मर्यादांचं भान ठेवायचं, नि दुसरीकडे हे सारं क्षणभंगुर आहे, निसर्गाधीन आहे ह्याची जाणीवही ठेवायची.

निसर्गाच्या मर्यादांचं भान म्हणजे काय?—त्याचे अनेक पैलू आहेत. आपण जी काही निर्मिती करणार, तिच्यासाठीची संसाधनं नवीकरणक्षम आहेत ना; आपला त्यांच्या वापराचा वेग हा त्यांच्या नवीकरणाच्या वेगापेक्षा कमी आहे ना; वापरायच्या ऊर्जा ह्या भांडवली (capital) स्वरूपाच्या नसून आय (income) ह्या स्वरूपाच्या आहेत ना; तंत्रज्ञानाचा पर्यावरणावरचा आघात न्यूनतम आहे ना... असे अनेक पैलू विचारात घ्यायचे. स्थानिकता, विकेंद्रितता, विघटनक्षमता, श्रम-सघनता अशी अनेक पर्यावरणीय मूल्यं ह्यातून मग आपोआप जपली जातील. ह्या साऱ्यातून एकीकडे मानवी सर्जनाची भूकही भागेल, नि दुसरीकडे त्या सर्जिताची निसर्गस्नेहिताही जपली जाईल.

अन् हे सर्जन करतानाही त्याच्या संहाराचं भान जागं ठेवायचं. निसर्ग ही एक नित्यपरिवर्तनशील गोष्ट आहे; इथे कोणतीही निर्मिती अनंत काळ टिकू शकत नाही, हे लक्षात ठेवायचं. सर्जिताचा संहार होतोच होतो, हे ध्यानात ठेवायचं. त्या चक्राची जाणीव ठेवायची. सर्जन चांगल्यात चांगलं करायचं; पण सर्जितात गुंतून राहायचं नाही. शक्य तर आपणच त्याचं वि-सर्जन करायचं.

भारतीय तत्त्वज्ञानानं भारतीयांचं मानस ह्याच प्रकारे घडवलं. त्यामुळेच अभ्युदय (ऐहिक प्रगती) आणि निःश्रेयस (आध्यात्मिक प्रगती) ह्या दोन्हींची प्राप्ती इथे होत राहिली. चौदा विद्या–चौसष्ट कलांची जोपासना ह्या देशानं केली; पण, 'नलिनीदलगत जलम् अतितरलम् । तावद् जीवनम् अतिशयचपलम्' हे वास्तवही तो कधी विसरला नाही. त्यामुळेच ती भौतिक प्रगती टिकाऊ ठरली, धारणाक्षम ठरली. निसर्गाची हानी करून होणारी निर्मिती इथे निषेधार्ह होती.

आजचे विकासवादी ह्याला कितीही नावं ठेवोत : विकासाचं हेच प्रतिमान धारणाक्षम आहे. आजच्या समृद्धीच्या झगमगाटाला भुललेले भौतिकवादी लोक ह्या संयमित प्रगतीची कितीही कुचेष्टा वा निंदा करोत : एक सत्य निरपवादपणे उरतंच की, आजच्या निसर्गविरोधाची, निसर्गहानीची फार मोठी किंमत आपण आजही मोजत आहोत, नि उद्या ह्याहूनही मोठी किंमत मोजावी लागणार आहे. मानव संयमितपणे जगला म्हणून नैसर्गिक आपत्ती येणारच नाहीत असं नाही; पण, मानवाची अनिर्बंध वागणूक अशा आपत्तींची संख्या, प्रमाण, शक्यता आणि तीव्रता वाढवते, हे मात्र निश्चित. निसर्गतः कडे कोसळणारच; महापूर येणारच; भूकंप-ज्वालामुखींचे उद्रेक होणारच; वणवे लागणारच; त्सुनाम्या उसळणारच. पण म्हणून डोंगरांवर वृक्षतोड करून, रस्ते बांधून, माती धुपवून, नद्या गाळानं भरवून, जागतिक तापमानवाढ करून आपण अशा आपत्तींचं प्रमाण वाढवायचं का? निसर्गतः हे घडेलही : त्यावर आपल्यापाशी उपाय नाही. प्रश्न आहे तो त्यात भर घालण्याचा.

मानववंशशास्त्राचा एक महत्त्वाचा सिद्धान्त असा आहे की, ज्या सभ्यता निसर्गाच्या विरोधात गेल्या; ज्यांनी निसर्गावर विजय मिळवायचा प्रयत्न केला, त्या त्यामुळेच नाश पावल्या. अन् ज्या सभ्यता निसर्गाच्या साथीत जगल्या त्या टिकून राहिल्या. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य असे त्यांचे ढोबळ गट पडतात.

आज हे गट वेगळे उरलेले नाहीत. जपानी, चिनी आणि भारतीय सभ्यताही 'पौर्वात्य' राहिलेल्या नसून साऱ्यांचं वैचारिक-व्यावहारिक पश्चिमीकरण झालेलं आहे. ह्या आजच्या 'विकासा'विषयीही ते धूलिकण असं काहीतरी म्हणत असतील :

उद्योग वाहने याने उंच मनोरे
धरणे अन् रस्ते रूळ बंदरे सारे
संगणक ग्रंथ संपर्कसाधने शस्त्रे
जाईल गाडली सारी तुमची प्रगती
मातीवर चढणे एक नवा थर अंतीं !

जीवनशैली बदलून आपण हे भागधेय बदलू शकतो. आपल्या कर्मानं येणारं मरण तरी किमान टाळू शकतो. त्यासाठी आवश्यकता आहे भारताच्या मूळ जीवनध्येयाची आणि भारतीय जीवनदृष्टीची!

### विकासाचे पर्याय

ग.सं.चा यंदाचा जोड-विशेषांक असेल ह्या विषयावरचा.

'विकास म्हणजे GDP ह्या परिमाणात मोजली जाणारी वाढ' ही व्याख्या शिरोधार्य मानून जगातली प्रायः सारी राष्ट्रं उपभोग, उत्पादन आणि GDP वाढवण्याच्या प्रयत्नांत आहेत. पण, GDP वाढवण्याच्या ध्येयाकडे झापडबंदपणे जाण्यामुळेच अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांची माहिती करून घेताना आपला भर असणार आहे पर्यावरणाच्या समस्यांवर. GDPच्या संकल्पनेतील कोणत्या त्रुटींमुळे आणि लबाड्यांमुळे ह्या समस्या उद्भवल्या आहेत हे आपण बघणार आहोत. त्यानंतर, विकासाच्या ज्या पर्यायी मोजपट्ट्या पुढे ठेवण्यात आल्या आहेत त्यांची माहिती घेणार आहोत.

ह्या मोजपट्ट्यांपैकी एक आहे GNH : Gross National Happiness. सकल राष्ट्रीय आनंद/समाधान. आपल्या शेजारच्या भूतान देशाच्या माजी राजांनी ही संकल्पना मांडली आहे. तिची, नि त्यानुसार चालू असलेल्या भूतानच्या जडणघडणीची सविस्तर माहिती आपण ह्या अंकात वाचणार आहोत. भूतानला भेट देऊन आलेल्यांपैकी कोणी आपले त्याविषयीचे अनुभव लिहिणार असेल, तर त्याचं स्वागत आहे. १५ ऑक्टोबरपर्यंत ते लिखाण कुडावळ्यात पोहोचावं. अशाच वेगळ्या प्रकारे आपल्या देशाला 'सेंद्रिय' वळण दिलं क्यूबाच्या फिडेल कॅस्ट्रोनं. त्याचीही माहिती आपण घेणार आहोत. शिवाय, जगातील विविध देशांनी विकासाचे विभिन्न पर्याय स्वीकारले आहेत, त्यांचीही धावती ओळख आपण करून घेणार आहोत.

❑ *हा अंक असेल सौर कार्तिक आणि अग्रहायणाचा (ऑक्टोबर-नोव्हेंबरचा) जोड अंक. तो नोव्हेंबरात प्रसिद्ध होईल. दरम्यान ऑक्टोबराचा अंक प्रसिद्ध होणार नाही.* ❑ *ज्यांची वर्गणी ऑक्टोबराच्या अंकाबरोबर संपते, अशांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत नूतनीकरण केलं, तरच त्यांना हा जोड अंक पाठविला जाईल; अन्यथा अशा सर्वांना १२वा अंक म्हणून डिसेंबराचा अंक पाठविण्यात येईल, ह्याची कृपया नोंद घ्यावी. —संपादक*

*जुलैच्या अंकातील चेतन पंडितांच्या लेखाला एका वाचिकेने दिलेले उत्तर*

## विकासाची प्रचंड किंमत

**मीनल कुष्टे**

जुलै महिन्याच्या ग.सं.मध्ये चेतन पंडितांचे विकासासंबंधीचे मत वाचनात आले. 'विकास का व कसा हे समजावून घेण्याची आवश्यकता आहे' असे पंडितांचे म्हणणे आहे. पण, पर्यावरणाची हानी करून जो विकास त्यांना अभिप्रेत आहे तो पाहण्यासाठी आधी मानव व इतर सजीव जिवंत राहणे गरजेचे आहे.

अमेरिकेच्या 'नासा' ह्या संस्थेच्या 'गोडार्ड इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस स्टडीज्'चे संचालक व प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जेम्स हॅनसेन हे ह्या क्षेत्रातील सर्वोच्च तज्ज्ञ आहेत. त्यांचा 'स्टॉर्म्स ऑफ माय ग्रँडचिल्ड्रेन' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. त्याच्या मुखपृष्ठावर ते नमूद करतात की, 'वातावरणातील बदल हा महाविनाशकारी आहे. ही मानवाला वाचविण्याची शेवटची संधी आहे.' पण, पंडितांच्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्रीय सुबत्ता ही सर्वांत महत्त्वाची : मग त्यासाठी निसर्गाचा बळी गेला तरी चालेल. कच्च्या मालासाठी खाणी; शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सिंचन-विस्तार (ह्यात आर्थिक स्थिती कोणाची सुधारते ते आपण बघतो आहोतच); मोठाली धरणे, त्यासाठी होणारी मोठ्या प्रमाणातली जंगलतोड; औष्णिक- व अणु-वीज प्रकल्प व त्यातून प्रदूषण ह्या सर्वांची किंमत द्यावीच लागते; हे सर्व अपरिहार्य आहे. मी ह्याला पृथ्वीची, पर्यावरणाची नासधूसच म्हणेन. ती करून जी सुबत्ता मिळते, त्याचे जीवनावर अनेक दुष्परिणाम होतात. उदा. तारापूर येथील अणुऊर्जेमुळे (१) प्रत्येक घरटी एक कॅन्सर पेशंट; (२) डहाणूतील चिकूचे घटते उत्पादन; (३) समुद्रातले मासे नष्ट झाल्यामुळे मच्छिमारांचे हाल.

हवामानातील बदलांमुळे वाढणारे उष्णतेचे प्रमाण, अनियमित पडणारा पाऊस, कधीही पडणाऱ्या मोठ्या आकाराच्या गारा, नाशिकसारख्या ठिकाणी भुरभुरणारे बर्फ, हे सर्व का घडते आहे? ह्याचा विकासाशी संबंध आहे का? ह्याचे उत्तर होय असेच आहे. आणि दुःखद गोष्ट ही आहे की, ह्या सर्व गोष्टींचा कोणी विचारच करत नाही. बरे, हे फक्त आपल्याचकडे घडते आहे असे नाही; तर, जगभरात हे घडत आहे. एका पाहणीची निरीक्षणे पुढे देत आहे :

(१) २८ मे २०१३ : अमेरिकेतील ओक्लाहोमा शहराला ताशी ३२० कि.मी. वेगाच्या टोर्नेडोने उध्वस्त केले.

(२) ऑगस्ट २०१३ : अमेरिकेत अतिवृष्टी; कोलोरॅडो नदीला महापूर; रस्ते, पूल, शहरे उद्ध्वस्त.

(३) सप्टें.-ऑक्टो. २०१३ : ऑस्ट्रेलियामध्ये वणवे. शेकडो चौ.कि.मी. क्षेत्रातील जंगल जळाले.

(४) ऑक्टो. २०१३ : फिलिपाईन्स देशाचा मोठा भाग उध्वस्त करणारे ताशी ३५० ते ४०० कि.मी. वेगाचे चक्रीवादळ. मध्य अमेरिकेत एका दिवसात ८२ टोर्नेडो. मध्यपूर्वेच्या वाळवंटात रियाधमध्ये मोठा पाऊस.

(५) नोव्हें. २०१३ : जपान, चीनमध्ये विक्रमी बर्फवृष्टी.

*(पृष्ठ २ वर)*

## 'जीत-हार' ते 'जीत-जीत' १३

**दिलीप कुलकर्णी**

नुकताच गणेशोत्सव पार पडला. आता पाठोपाठ येईल नवरात्र आणि मग महिन्याभरानं दिवाळी. माणसाच्या नेहमीच्या 'त्याच-त्याच' आयुष्यात वेगळेपणा आणणारे, नि त्यातून उत्साह-आनंद देणारे असे सण-समारंभ जगभरातले सर्वच मानवसमूह साजरे करत असतात. निसर्गात त्या त्या काळात जे भरपूर प्रमाणात उपलब्ध होतं, त्याचा मनसोक्त आस्वाद घेणं; तो एकट्यानं न घेता सर्वांनी मिळून घेऊन आनंदात आणखी भर घालणं हे सण-उत्सवांच्या माध्यमातून माणूस साध्य करतो. खाणं-पिणं-नाचणं-गाणं ह्यातून हा आनंद लुटायचा.

जोवर हे सगळं ऊर्जा आणि तंत्रज्ञान ह्यांचा वापर न करता होतं, तोवर तो सर्वांसाठीच जीत–जीत खेळ असतो. पण, सध्याचा काळ हा प्रचंड प्रमाणावर ऊर्जा आणि तंत्रज्ञानांचा वापर करण्याचा आहे, नि परिणामत: ते खेळ हार–हार असे होऊ लागले आहेत.

गणेशोत्सवापासूनच सुरुवात करू या. प्लॅस्टरच्या गणेशमूर्ती, थर्माकोलची सजावट, प्लॅस्टिकच्या पताका आणि झिरमिळ्या, विजेच्या दिव्यांची रोषणाई... सारं काही निसर्गाची हानी करणारं आहे. मूर्तिकार, वस्तूंचे उत्पादक, विक्रेते ह्यांची ह्यात 'जीत' असली तरी; तरी, केव्हा ना केव्हा तरी निसर्गाची ती हानी सर्वांनाच भोगावी लागणार आहे, नि तो खेळ 'हार–हार' असाच होणार आहे. प्राय: सर्वजणच भक्ती, मांगल्य ह्यांना दुर्लक्षून बाह्य भपक्याच्या मागे लागल्यानं निसर्गाची हार प्रतिवर्षी वाढत आहे. प्लॅस्टरच्या मूर्तींचं संकलन करून दगडखाणीत त्यांची निर्गत करणं ही समस्येची अत्यंत तात्पुरती सोडवणूक आहे. अ-विघटनक्षम पदार्थ निसर्गात कुठेही टाकला, तरी तो हानीकारकच. 'मला त्रास होणार नाही' अशा ठिकाणी तो टाकण्याची सोय 'अंनिस'नं केली, तर बरंच आहे : मी जिंकीन! निसर्ग हरतोय ह्याची पर्वा कशाला करायची! शाडूची माती वापरणं ही देखील निसर्गाची हारच.

गणेशोत्सवातला वीज-वापर हाही असाच जीत–हार खेळ. प्रचंड प्रदूषण करून वीज तयार करायची, नि अशा अपव्ययी उद्देशानं वापरायची. प्रदूषणामुळे होणारी निसर्गाची हानी जागतिक तापमानवाढीच्या दुष्परिणामांच्या रूपानं आपल्यालाच भोगावी लागते, हे आपण उत्सवाच्या बेभानपणात विसरून जातो. असा वीज-वापर हा अनेकदा चोरीचा असतो. म्हणजे गणेश-मंडळं जिंकतात; पण, समाज मात्र हरतो.

ध्वनिवर्धकांचे अति तीव्र आवाज हा तर थेटपणेच 'हार–हार' खेळ असतो. ते लावणाऱ्यांनाही त्याचा त्रास होतो, नि ऐकणाऱ्यांनाही. बधीर झालेले कान आणि मनं ह्यांमुळे ध्वनिवर्धक लावणाऱ्यांना त्या हानीची जाणीव नसते, एवढंच.

मूर्तींप्रमाणेच थर्माकोल/प्लॅस्टरची सजावट, गुलालाचा वापर ह्या बाबीही निसर्गाची हानीच करतात. 'उत्सव संपल्यावर हे पदार्थ कुठे जात असतील' हा विचार आपल्या मनात कधी येतो का?

—हे सारे हार–हार खेळ थांबायचे; त्यांची जागा जीत–जीत खेळांनी घ्यायची, तर आवश्यक आहे, अर्थातच, आपली स्वैच्छिक हार. स्थानिक मातीच्याच मूर्ती; छोट्या मूर्ती; त्यांचं परिसरातच विसर्जन; नैसर्गिक-विघटनक्षम पदार्थांचीच सजावट; विजेचा सर्व प्रकारचा वापर टाळणं... अशा कृतींतूनच गणेशोत्सव निसर्गस्नेही होऊन जीत–जीत स्थिती येईल. उत्सव नाकारायचं कारण नाही; पण, तो निसर्गस्नेही असण्याचं बंधन मात्र पाळलंच पाहिजे.

नवरात्रीचा उत्सव हा गणेशोत्सवाइतका व्यापक नसतो, हे सुदैवच. पण त्याची ही छोटी आवृत्तीही त्रासदायकच असते. हल्ली अनेक ठिकाणी असं दिसतं की, गणेशोत्सवासासाठी घातलेले मांडव दसऱ्यापर्यंत तसेच असतात. ते वाहतुकीला अडथळा करत राहतात. ह्यात मंडळं आणि कार्यकर्ते जिंकतही असतील; पण, समाज मात्र हरत असतो. तेच दांडियाच्या संयोजकांचंही. रात्र-रात्र चालणाऱ्या त्या प्रदूषणामुळे समाजाची हार होत राहते.

दिवाळी हा देखील आताशा हार–हार खेळच झाला आहे. फटाक्यांचे उत्पादक, विक्रेते हे 'जिंकतात' असं आपल्याला वाटतं; वास्तवात तेही समाजाचाच भाग असल्यानं त्या प्रदूषणामुळे तेही हरत असतातच. वाईट हे आहे की, फटाके उडवणाऱ्यांना; विषारी रंगांच्या रांगोळ्या काढणाऱ्यांना; वृक्षतोडीतून तयार झालेली कागदी शुभेच्छापत्रं पाठवणाऱ्यांना; आणि प्रदूषणातून तयार झालेली वीज वापरून ई-शुभेच्छा पाठवणाऱ्यांना : कोणालाच त्या हारींचं भान नसतं.

ह्यावरचा 'जीत–जीत' उपायही 'साधेपणा' हाच आहे. ऊर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञान न वापरता जे करता येणं शक्य आहे, तेच उत्सवांचं इष्टतम प्रमाण आणि स्वरूप. एकदा का हा वापर सुरू झाला की, मग वाढीला मर्यादा राहत नाही, आणि म्हणून हारीलाही. घराजवळच्या मातीचीच गणेशमूर्ती बनवून तिचं तिथेच विसर्जन करणं; पानं-फुलं-फळं ह्यांचीच आरास करणं; तेलाचे वा तुपाचेच दिवे लावणं; आरत्या तोंडानंच म्हणणं; दिवाळीच्या फराळाचे पदार्थ घरी करून मनसोक्त खाणं; फटाके न उडवणं; सर्वांच्या भल्याची प्रार्थना मनोमन करणं; ठिपक्यांच्या छोट्या रांगोळ्या काढणं... असं सण-उत्सवांचं स्वरूपच निसर्गाला जिंकवेल.

* * *

गेलं सुमारे वर्षभर चालू असलेल्या ह्या लेखमालेत, वाचकहो, आपण ह्याच मुद्द्यापाशी पुन:पुन्हा येत आहोत की, निसर्गाशी आपले सध्या जे 'जीत–हार' खेळ चालू आहेत, ते घातक आहेत; अंतिमत: त्यांची परिणती हार–हार खेळातच होणार आहे; नि म्हणून आपण आपलं वागणं बदलून हे खेळ 'जीत–जीत' असेच करायला हवेत. केवळ निसर्गच नव्हे, तर समाज आणि कुटुंब ह्या वरच्या प्रणालींबरोबर चाललेले व्यक्तींचे खेळही 'जीत–जीत'च असायला हवेत.

ह्यातून जो सामायिक निष्कर्ष निघतो, तो आपण जवळपास प्रत्येक वेळीं नोंदवला : वरच्या प्रणालींच्या जितीसाठी खालच्या प्रणालींनी स्वैच्छिक हार स्वीकारायला हवी. वरिष्ठ प्रणालीच्या जितीत कनिष्ठ प्रणालीची जीतही सामावलेलीच असते.

आज ज्या असंख्य छोट्या-मोठ्या समस्या आपल्याला पदोपदीं आणि क्षणोक्षणीं जाणवतात, त्या प्राय: व्यक्तींच्या ताठरपणामुळे, अहंकारामुळे, स्वत:ला श्रेष्ठतम समजून त्यांनी मुळीच नमतं न घेण्यामुळे उद्‌भवलेल्या असतात. 'व्यक्तीची जीत–इतर प्रणालींची हार' असंच चित्र त्यामुळे व्यवहारात सर्वत्र दिसतं. व्यक्तींनी स्वैच्छिक हार स्वीकारण्यातूनच केवळ हे चित्र बदलू शकतं. आपला प्रयत्न, सदैव, अशा प्रकारे वागून वरच्या प्रणालींची जीत सुनिश्चित करण्याचा हवा.

कुटुंब, समाज, राष्ट्र आणि निसर्ग ह्या वरच्या प्रणालींची जीत होण्यासाठी व्यक्तींनी तर अशी स्वैच्छिक हार स्वीकारायलाच हवी; पण, निसर्ग ह्या सर्वोच्च प्रणालीच्या जितीसाठी कुटुंब, समाज आणि राष्ट्रांनीही सतत स्वैच्छिक हार स्वीकारली पाहिजे. ह्या लेखमालेतून आपण सातत्यानं हाच संदेश घेत राहिलो. तो कायमचा मनावर कोरून ठेवूनच ही लेखमाला समाप्त करू या.

☯

*(समाप्त)*

---

# देवासचे 'शेततळे अभियान' (उत्तरार्ध)

**मीनाक्षी अरोड़ा आणि सिराज केशर**

*'एकामागून एक नलिकाकूप खोदणं हा जीत–हार खेळ असतो; त्याची परिणती हार–हार खेळातच होते' ह्या नियमाचं उत्तम उदाहरण म्हणजे देवास जिल्हा. ह्या हार–हार खेळातून तिथले शेतकरी जीत–जीत खेळाकडे कसे गेले ह्याचा 'गांधी-मार्ग'मध्ये प्रकाशित झालेला हा वृत्तान्त.*

रघुनाथसिंहांचा तलाव पाहून २००५ मध्ये जिल्ह्यातल्या इतर गावांमधल्या शेतकऱ्यांनीही तलाव बांधायला सुरुवात केली. हा क्षण देवासच्या पाण्याच्या इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. आता रघुनाथसिंहाच्या दृष्टीनं नलिकाकूपांचं महत्त्व खूपच कमी झालं होतं. सिंचनाचं बरंचसं काम तलावातल्या पाण्यानं होऊ लागलं होतं. तलावाच्या पहिल्या वाढदिवशी त्यांनी नलिकाकूपाची अंत्येष्टी साजरी केली!

त्याच सुमारास, जिल्ह्यातल्या जलसंकटाचा सामना करण्यासाठी नवं धोरण ठरवण्याच्या दृष्टीनं देवासच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एक शेतकरी-मेळावा आयोजित केला होता. त्यात रघुनाथसिंह तोमर ह्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आपला अनुभव सांगितला. जिल्हाधिकाऱ्यांच्या असं लक्षात आलं की, तलावासाठी शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य देण्याची कोणतीही सरकारी योजना नाही; तसंच, कोणतीही बँकसुद्धा ह्यासाठी कर्ज देत नाही. जिल्हाधिकाऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन कृषिविभागानं शेतकऱ्यांना काही मदत देण्याचं ठरवलं. ह्या अभियानाला 'भगीरथ अभियान' असं नाव दिलं गेलं. तलाव-निर्मितीमुळे शेतकऱ्यांनी खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामांत पिकं घ्यायला सुरुवात केली. कृषि-मेळाव्यांत ते आपले अनुभव सांगू लागले. अनेकांनी स्वखर्चानं गावोगाव दौरे करून अन्य शेतकऱ्यांना ह्या अभियानात सामील करून घेतलं. शेतकऱ्यांनी सांगितलं की, आपल्याच शेतात तलाव असणं हीच संपन्नतेची गुरुकिल्ली आहे. एक एक करता करता त्या भागातल्या शेतकऱ्यांनी तब्बल ६०००हून अधिक तलाव बांधून स्वावलंबनाची एक नवी परिभाषा रूढ केली!

हरनावदा गावातली वयस्कर मंडळी सांगतात की, पूर्वी प्रत्येक शेतकऱ्याचा स्वतंत्र तलाव असायचा. जेव्हा त्यांनी पारंपरिक सिंचन-व्यवस्थेकडे दुर्लक्ष केलं, आणि तलाव बुजवून त्यावर शेती करणं सुरू केलं, तेव्हापासून हे जलसंकट उभं राहिलं आहे. बड्या लोकांनी सार्वजनिक जलस्रोतांवर कब्जा केला आणि उरल्यासुरल्या स्रोतांची अवस्था अधिकाधिक वाईट होत गेली. कोणीही त्यांच्या पुनरुद्धाराचा विचार केला नाही. त्यात नलिकाकूपांनी संकटात अजूनच भर घातली. शेतकऱ्यांनी कर्ज काढून नलिकाकूप खोदले. स्वत: तोमर सांगतात की, २५ वर्षं ते त्यांच्या शेतात इथे-तिथे नलिकाकूप खोदत होते. पण, आता त्यांनी तलाव बांधल्यावर त्याचा होणारा फायदा बघून, जो तो आता तसंच करू लागला आहे.

लोकांनी स्वावलंबनानं जवळजवळ १७०० तलाव बांधले. लोकांचा उत्साह पाहून सरकारनं त्यापासून धडा घेतला नि 'बलराम तलाव योजना' तयार केली. तिच्या मदतीनं आणखी जवळजवळ ४००० तलाव बनले. शेतकऱ्यांना प्रति तलाव ऐंशी हजार ते एक लाखापर्यंतची मदत दिली जाते.

ज्यांच्याकडे अगदीच छोटं शेत आहे, ते आपल्या जागेत तलाव बांधू शकत नाहीत; पण, शेजारच्या मोठ्या शेतातल्या तलावांमुळे त्यांच्या नलिकाकूपांचं पुनर्भरण होऊन पाण्याची पातळी वाढली आहे.

टोंकखुर्द तालुक्यातल्या धतुरिया गावात ३०० कुटुंबं आहेत आणि तलाव आहेत १५०. हे सर्व तलाव २००६मध्ये बांधले गेले. पाणीटंचाईमुळे ह्यातले बहुतांश शेतकरी कर्जबाजारी झाले होते. तलाव बांधल्यानंतर उत्पन्नात वाढ होऊन दोन वर्षांतच ते सगळे कर्जमुक्त झाले. पूर्वी जनावरांसाठी चारा विकत घ्यावा लागायचा : आता स्वत:च्या जनावरांसाठी हिरवा चारा तर होतोच, शिवाय तो विकलाही जातो. ह्या चाऱ्यामुळे दुधाच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. तलावांचं प्रमाण वाढल्यावर गावांमधल्या गायींच्या संख्येतही वाढ झाली आहे. भैरवान खेडी नावाच्या गावात ७६ कुटुंबं आहेत. त्यांच्याकडची शेतं छोटी आहेत. त्यांचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत दूध हाच आहे. आज त्या गावात १८ तलाव आहेत.

देवासच्या ग्रामीण भागांतील जलस्तर २०० ते ४०० फुटांपर्यंत खाली गेला होता; तलावांमुळे आता तो ३० ते ४० फूट, किंवा त्याच्याही वर आला आहे. गावांमधल्या ह्या सुंदर कामाचा परिणाम म्हणून देवासची भूजलाची पातळीही ३०० फुटांवरून १७० फुटांपर्यंत उंचावली आहे.

शासन आणि समाज एकत्र येऊन अशाच उत्तम प्रकारे काम करत राहिले, तर गेल्या ४०-५० वर्षांतील चुका ४-५ वर्षांतच सुधारता येतील.

☯

*('गांधी मार्ग'च्या जाने.-फेब्रु. २०१३च्या अंकातील लेखाचं संपादित पुनर्मुद्रण; साभार. अनुवाद : पौर्णिमा.)*

---

***विकासाची किंमत...*** *(पृष्ठ १ वरून)*

(६) डिसें. २०१३ : अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील कॅलिफोर्नियामध्ये तीव्र अवर्षण, दुष्काळ.

(७) डिसें. २०१३, जाने. २०१४ : अमेरिकेत काही ठिकाणी तापमान –६०°से.पर्यंत घसरले; तर, दक्षिण अमेरिका खंडात अर्जेंटिनामध्ये तापमान +५२°से. झाले. उष्माघाताने हजारो पशुपक्षी मेले. ऑस्ट्रेलियात तापमान ५२ ते ५५°से.पर्यंत वाढले. त्यामुळे शेकडो माणसे व हजारो पशुपक्षी उष्माघाताने मेले. तसेच, ऑस्ट्रेलियन ओपन ह्या टेनिस स्पर्धेतून दहा अव्वल खेळाडूंनी 'उष्णता सहन होत नाही' म्हणून अंग काढून घेतले.

(८) फेब्रु. १४ : थेम्ससह सर्व नद्यांना अभूतपूर्व महापूर. भारतात काश्मीरमध्ये विक्रमी बर्फवृष्टी. महाराष्ट्रात २५ जिल्ह्यांत टेनिस बॉल किंवा टरबुजाच्या आकाराच्या गारांचा वादळी पाऊस. ह्यामुळे घरे, पिके, फळबागा उद्‌ध्वस्त झाल्या. हजारो पशुपक्षी मेले. ४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

नासाच्या अभ्यासाप्रमाणे सध्याची कार्बनची वाढ वर्षाला २ पी.पी.एम. आहे. ४२० पी.पी.एम एवढे प्रमाण होत असताना, म्हणजे फक्त १० वर्षांत, तापमानवाढ अनियंत्रित व अपरिवर्तनीय होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास ह्या शतकात मानवजातीसह सर्व जीवसृष्टी नष्ट होईल. यूनोच्या २००७च्या अहवालात ह्याची प्रमुख कारणे (१) उद्योग, (२) ऊर्जानिर्मिती, (३) बांधकाम, (४) वाहतूक, (५) आधुनिक रासायनिक शेती, (६) जंगलतोड व (७) सागरातील हरितद्रव्य नाहीसे होणे अशी दिलेली आहेत.

ह्यावरचे उपाय : साधेपणाने जीवन जगणे; मोटारी (७५% कार्बन-उत्सर्जनाला कारण) व वातानुकूलन-यंत्रांचा वापर बंद करणे; कॉंक्रिटीकरणाचा (रस्ते, बांधकामे) आग्रह सोडणे; वीज किमान वापरणे; वस्तू-वापराचा हव्यास/भोगलोलुपता सोडणे, वस्तू पुन:पुन्हा वापरणे, पुनर्निर्मिती करणे; ऊर्जाविरहित नैसर्गिक/सेंद्रिय/परंपरागत शेतीवर आधारित जीवनाकडे वळणे.

हे सविस्तर लेखन करण्यामागचा उद्देश एवढाच आहे की, पंडितांना जो विकास अभिप्रेत आहे व त्यासाठी जी किंमत द्यावी लागेल असे ते सांगताहेत, त्यापेक्षा कैकपटीने जादा किंमत आपण मोजतो आहोत. म्हणून सांगावेसे वाटते की, विकासासाठी निसर्गाला वेठीस धरू नका. पर्यावरणप्रेमींनी विकास-साक्षरतेचे धडे शिकण्याची नव्हे; तर, विकासाची झापडे लावलेल्यांनीच आता खरे धडे शिकण्याची गरज आहे.

☯

**ग.सं.ची वार्षिक वर्गणी...**

*☐ पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते. ☐ म.ऑ.ने पाठवणाऱ्यांनी ती कुडावळ्यास पाठवावी. ☐ प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाची ३०रु.ची स्वतंत्र म.ऑ. करावी, जेणेकरून त्यांचा नाव-पत्ता आम्हाला त्याच वेळीं कळेल. ☐ जुन्या वर्गणीदारांनी नावानंतर कंसात आपला पावती क्रमांक लिहावा.*

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय ५

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. आता दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

### अंतर्गत उदारीकरण : सारं काही फुकट?

प्रकल्पांचे निर्माते आणि उद्योगसम्राट ह्यांच्यातील पार्यावरणिक आणि सामाजिक दायित्वाच्या अभावामुळे उद्योगीकरण झालेल्या जगातील सर्व राष्ट्रांमध्ये, औद्योगिक आणि विकासात्मक प्रकल्पांच्या बाबतीत, पार्यावरणिक मानकं आणि नियंत्रणं अधिकाधिक कडक बनत गेली. भारतात मात्र ह्याच्या नेमकी उलटी प्रक्रिया चालू आहे.

१९९४मध्ये 'पर्यावरण-संरक्षण-अधिनियम, १९८६'च्या अंतर्गत एक अधिसूचना जारी केली गेली. विशिष्ट प्रकल्पांसाठी पर्यावरण-आघात-पडताळणी सक्तीची करण्याबाबतची ही अधिसूचना होती. ती मुळातच दुबळी होती; तसंच, तिच्या अंमलबजावणीत अनेक अपयशं आली. असं असूनही, विकास-नियोजनात तिच्यामुळे काही प्रमाणात तरी पार्यावरणिक संवेदनशीलता जोपासली गेली. पण, उद्योगपती, राजकारणी आणि विकास-अर्थतज्ज्ञ ह्यांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण 'एक कटकट' असाच होता. मग, केंद्र शासनानं नियुक्त केलेल्या एका समितीनं हा 'अडथळा' कमी करण्याची शिफारस केली; तर, 'पार्यावरणिक प्रशासना'चा आढावा घेणाऱ्या विश्व बँक-पुरस्कृत एका प्रक्रियेत ह्या आणि अन्य नियामक उपायांत 'सुधारणा' (वाचा : शिथिलीकरण) करण्याची सूचना केली गेली. परिणामत: २००६मध्ये जन-विरोधाला न जुमानता, सरकारनं ह्या अधिसूचनेत बदल केले. त्यामुळे उद्योगांसाठीच्या आणि विकास-प्रकल्पांसाठीच्या परवानग्या मिळवणं खूप सोपं झालं. जनसुनावणीच्या सक्तीबाबतच्या तरतुदींमध्येही शिथिलता आणली गेली. ज्यांना पार्यावरणिक मंजुरी आवश्यक आहे अशा प्रकल्पांच्या यादीतून 'पर्यटना'ला वगळण्यात आलं. हे क्षेत्र अनेक ठिकाणी नुकसानकारक ठरत आहे ह्याचे पुरावे असूनही असं करण्यात आलं.

ह्या (आणि पूर्वी उल्लेखिलेल्या अन्यही) बदलांचा परिणाम म्हणजे पार्यावरणिक मंजुरी मागणाऱ्या आणि मिळणाऱ्या प्रकल्पांच्या संख्येतील भरघोस वाढ. हा रेटा इतका जोरदार आहे की, पर्यावरण आणि वन मंत्रालयाला ह्या प्रकल्पांच्या परिणामांचा अभ्यास करणं, किंवा त्यांची तपासणी करणं अशक्य होऊन बसलं आहे. २००९च्या प्रारंभी ह्या मंत्रालयाकडे ६०००हून अधिक प्रकल्पांच्या तपासणीचं काम होतं. कर्मचारी-संख्या होती अवघी २०. परिणामत:, पार्यावरणिक मान्यता मिळालेल्या प्रकल्पांची तपासणी ३ ते ४ वर्षांतून एकदा होते.

जागतिकीकरणाचा पार्यावरणिक नियमनांवरचा प्रभाव स्पष्ट करणारं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे १९८०चा वन-संरक्षण कायदा. त्याच्या अनुसार वन-जमिनींचा वनेतर कारणांसाठी उपयोग करण्यासाठी केंद्र शासनाची अनुमती घेणं अनिवार्य आहे. आता ह्या कायद्याचं रूपांतर 'वन-विनाश कायद्या'त झालं आहे. पूर्वी खाणींच्या बाबतीत सांगितल्याप्रमाणे, जागतिकी-करणाच्या युगात वनजमिनींचं वनेतर कारणांसाठी होणारं वर्गीकरण सतत वाढत गेलं आहे. १९८०-८१नंतर असं जे वर्गीकरण झालं, त्यापैकी जवळजवळ निम्मं २००१-२नंतर झालेलं आहे.

१९८६च्या पर्यावरण-संरक्षण कायद्याअंतर्गत, १९९१मध्ये सागरकिनारा-नियमन-क्षेत्रांचा (CRZ) अधिनियम लागू केला गेला. सागर-किनाऱ्यांवरचं पर्यावरण वा उपजीविका ह्यांना धोका पोचवणाऱ्या कृतींवर बंधनं आणण्यासाठीच तो होता. मुळीच परिपूर्ण नसलेला, आणि बहुसंख्य राज्यांनी उदासीन राहून राबवलेला असा हा अधिनियम असूनही बरेच सागरकिनारे आणि तिथे राहणारे मच्छिमार समाज ह्यांना त्यामुळे संरक्षण मिळालं. पण, त्यामुळेच तो औद्योगिक आणि व्यापारी हेतू असणाऱ्यांच्या डोळ्यांत सलू लागला, आणि त्यांनी सरकारवर आणलेल्या दबावामुळे मूळ अधिनियमात २० सवलती दिल्या गेल्या. २००५-६मध्ये तर केंद्र शासनाच्या असं मनात आलं की, हा अधिनियम पूर्णपणेच बदलावा, आणि किनारी क्षेत्रांत काय झालेलं चालेल आणि काय चालणार नाही, हे राज्य सरकारांनीच ठरवावं. 'हे व्यापारी आणि औद्योगिक हितसंबंधीयांपुढे गुडघे टेकणं आहे', अशी जळजळीत टीका नागरिकांच्या संघटना आणि मच्छिमार-समुदायांनी (राष्ट्रीय मच्छिमार व्यासपीठासारख्या जाळ्यामार्फत) केली आहे.

जागतिकीकरणाच्या काळात मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आणखी एक व्यवसाय म्हणजे पर्यटन. १९९६मधली देशान्तर्गत पर्यटकांची १४ कोटींची संख्या २००७मध्ये ५२.७ कोटी इतकी वाढली. ह्याच काळातली विदेशी पर्यटकांची संख्या २२.९ लाखांवरून वाढून ५०.८ लाख झाली. पर्यावरण आणि संस्कृती जपण्यासाठी, तसंच संरक्षणाच्या दृष्टीनं संवेदनशील असणारे लडाख, अंदमान-निकोबार बेटं, लक्षद्वीप, पूर्वांचल असे, पूर्वी पर्यटकांना प्रवेश नसणारे भारताचे कित्येक भाग गेल्या काही वर्षांत खुले केले गेले आहेत. जागतिकीकरणपूर्व काळातही जिथे पर्यटनाला अनुमती होती असे भाग आज अतिरेकी, अनियंत्रित पर्यटनामुळे आक्रोश करत आहेत. नियमांच्या उल्लंघनाच्या शेकडो घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. उदाहरणार्थ, सागरकिनारा-संरक्षण-अधिनियमाची पायमल्ली करून बांधलेले पर्यटक-निवास. केरळातील एकट्या कोवालम्‌च्या किनाऱ्यावर अशी १५००हून अधिक अतिक्रमणं नोंदली गेली आहेत. कान्हा, बांधवगड, कॉर्बेट, पेरियार, रणथंभोर, बंदीपूर, नागरहोळे, इत्यादी जे व्याघ्रप्रकल्प वा अन्य संरक्षित क्षेत्रं आहेत, त्यांच्या भोवती पर्यटक-निवासांचा वेढा पडलेला आहे. त्यांचा ताण त्या क्षेत्रांतल्या सोयीसुविधांवर आणि कर्म-चाऱ्यांवर येतो; पर्यटनाचा आघात कमीत कमी व्हावा म्हणून घातलेल्या बंधनांचं ते शब्दश: आणि भावश: वारंवार उल्लंघन करतात; आणि राखीव क्षेत्राच्या देख-भालीत त्यांचा काडीचाही सहभाग किंवा योगदान नसतं. ☯

*(क्रमश:)*

---

## ग्रंथपरिचय

### स्त्री आणि पर्यावरण

सर्जनशीलता ह्या समान गुणधर्मामुळे असणारे स्त्रिया आणि पर्यावरण ह्यांच्यामधले साधर्म्य; त्यामुळे प्राचीन परंपरांच्या माध्यमातून निर्माण झालेले दोहोंमधले जवळकीचे नाते, आणि ह्या नात्याचे वर्तमानकाळातले स्वरूप हे सर्व स्पष्ट करणारे संशोधनात्मक लेखन म्हणजे वर्षा गजेंद्रगडकर ह्यांचे 'स्त्री आणि पर्यावरण' हे पुस्तक.

ह्या विषयाची व्याप्ती बरीच मोठी असल्यामुळे वर्षाताईंनी भारतीय परंपरा, स्त्री आणि पर्यावरण अशी मर्यादा निश्चित केली. प्राचीन भारतीय परंपरेमध्ये निसर्ग आणि माणूस—विशेषत: स्त्रिया—ह्यांच्यात एकरूपतेची भावना रुजलेली दिसते. वेद, संतसाहित्य, सण, उत्सव, शेती-परंपरा, व्रतवैकल्ये अशा सर्व ठिकाणी ह्याचे प्रतिबिंब आढळते. निसर्गरक्षणातली स्त्रियांची भूमिका, ग्रामीण भागातल्या दैनंदिन जीवनातून दिसणारी स्त्रियांची पर्यावरणविषयक जाणीव, भारतातील विविध भागांमधल्या श्रद्धा-समजुतींमागे असणारा पर्यावरण-विचार; त्याचबरोबर आधुनिक काळातली ह्या जाणिवेच्या उत्कटतेची पातळी, स्त्रिया आणि पर्यावरण ह्यांची परस्परावलंबी दुरवस्था ह्या सगळ्या विषयांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न ह्या संशोधनात त्यांनी केला आहे.

साधारणत: १९७०च्या दशकात भारतात स्त्रीवादी चळवळी जोम धरू लागल्या. मात्र आजपर्यंत ह्या चळवळींनी पर्यावरणाचे प्रश्न कधीच उचलून धरलेले नाहीत. तसेच, स्त्री आणि निसर्ग ह्यांची सांगड घालण्याचा प्रयत्नही केलेला दिसत नाही. भारतातील पर्यावरणवादी चळवळींचा इतिहास बराच मोठा असला, तरी १९७३च्या 'चिपको आंदोलना'पासून त्यांनी अधिक जोर धरला असे म्हणता येईल. म्हणजे दोन्ही चळवळींनी साधारण एकाच काळात जोर धरला. परंतु, दुर्दैवाने, त्या समांतर चालत राहिल्या. तथापि, निसर्गाविषयीचे स्त्रियांचे उपजात ज्ञान; स्वत: जगून निसर्ग जगवणारे त्यांचे निसर्गावरचे अवलंबन; आपल्या प्राचीन परंपरांचा निसर्गाशी असणारा जवळकीचा धागा ह्या सगळ्यांची एकत्र सांगड घातली, तर पर्यावरण आणि स्त्रिया ह्या दोन्हींचे प्रश्न अधिक वेगाने व चांगल्या प्रकारे सोडवता येतील असा विश्वास वर्षाताईंना वाटतो. विदेशी संकल्पनांऐवजी इथल्याच मातीत रुजलेल्या पर्यावरणविषयक जाणिवेला नव्याने उजाळा मिळावा हाही ह्या लेखनामागचा हेतू असल्याचे त्या स्पष्ट करतात.

विषयमांडणी तीन विभागांमध्ये आहे. पहिल्या विभागात प्राचीन भारतीय परंपरांचा पर्यावरणाशी असणारा दृढ संबंध स्पष्ट केलेला आहे. वैदिक काळाच्याही आधीपासून भारतीय भूमीवर निसर्गपूजेची ठळक परंपरा दिसते. संस्कृतीच्या विकासाबरोबर देवतांचे किंवा परपरांचे स्वरूप जरी बदलले, तरी निसर्गपूजेची परंपरा आणि निसर्गाशी एकरूप असण्याची मानसिकता कायम राहिली. भारतीय परंपरेत कायमच विश्वकल्याणावर, आणि हक्कांऐवजी धर्मावर (कर्तव्यावर) भर दिला गेला. त्यामुळे माणूस आणि निसर्ग ह्यांचे साहचर्य कायम राहिले. प्राचीन भारतीय संस्कृतीने निसर्गाकडे मानवी उपभोगाची वस्तू किंवा सुखाचे साधन म्हणून न पाहता कायम आदिमातेच्या रूपात पाहिले आहे. नव्या संकल्पनांना ह्या परंपरेतील शहाणिवेची जोड दिली, तर शाश्वत विकासाची वाट आपल्याला शोधता येईल असा विश्वास वर्षाताई व्यक्त करतात. ह्या पहिल्या विभागात प्राचीन परंपरांमधले स्त्री आणि भूमी ह्यांच्यातले साधर्म्य किंवा अभेद स्पष्ट करताना त्यांनी भारतातले विविध ठिकाणचे अनेकानेक सण-उत्सव, व्रते ह्यांचे दाखले दिलेले आहेत. चैत्रगौर, अक्षय्यतृतीया, कानबाईचा उत्सव, खंडोबाचं नवरात्र, इळाआवस, मकर संक्रांत, शाकंभरी नवरात्र, होळी, नागपंचमी, वटपौर्णिमा अशा महाराष्ट्रातल्या सण-उत्सवांबरोबरच कर्नाटक आणि तमिळनाडूतील करगा उत्सव, बंगालमधील सीतानवमी अशा उत्सवांची माहिती ह्यात आहे. भूमीला स्त्रीरूपात, आदिमातेच्या रूपात पाहण्याच्या दृष्टिकोणामुळेच स्त्री आणि निसर्ग ह्या दोन्हींची जपणूक आपुलकीने आणि सन्मानाने केली जात होती, हे त्यावरून लक्षात येते.

स्त्रियांचे बदलत गेलेले कौटुंबिक आणि सामाजिक स्थान, आणि जल-जंगल-जमीन ह्यांच्याशी असणारा त्यांचा संबंध ह्यांतले दुवे शोधण्याचा प्रयत्न दुसऱ्या विभागात केलेला आहे. शहरी भागातल्या स्त्रियांचे निसर्गाशी असणारे नाते जवळजवळ तुटल्यातच जमा आहे. ग्रामीण स्त्रीचे दैनंदिन जीवन मात्र अजूनही खूपसे निसर्गावर अवलंबून आहे. आपल्या रोजच्या गरजा भागवण्यासाठी जमीन, पाणी, जंगले हेच तिचे मुख्य मूलाधार आहेत. आज ह्या तिन्हींच्या बाबतीत फार झपाट्याने बदल घडत आहेत. शेतीमधल्या यांत्रिकी-करणामुळे स्त्रियांच्या कामांचे महत्त्व कमी

(पृष्ठ ४ वर)

---

## अ-मंगल कार्यं

### टोचणीबद्दल आभार!

लग्नाविषयीचा पार्यावरणिक दृष्टिकोण मी पहिल्यांदाच ग.सं.मध्ये वाचला आणि मला तो बहुतांशी पटलाही. ह्यापूर्वीही मला मोठमोठाले लग्नसमारंभ करण्याच्या अट्टहासाविषयी हसू यायचं, काही वेळा रागही यायचा; पण, त्याची कारणं निराळी आहेत. सध्या अशी स्थिती निर्माण झालेली आहे की, लग्नाची गाठ दोन जीव, दोन कुटुंबं ह्यांची नसून ती 'पैशाची गाठ' असते. पैशाची गाठ जितकी फुगीर तितकी मंडळी खूष असतात.

खरं तर, लग्नाला गेल्यावर त्यातले विधी व दांपत्य ह्यांमध्ये कोणालाच रस नसतो. गप्पाटप्पा आणि जेवण ह्यांतच सगळ्या पाहुण्यांना रस असतो.

त्यातही देवाणघेवाण (हुंडा हा कायद्याने गुन्हा ठरवूनही अप्रत्यक्षपणे हुंड्याची देवाणघेवाण होतेच), निमंत्रण, मानपान, नातेवाईक व इतर पाहुणेमंडळी ह्यांचे रुसवेफुगवे ह्यांतच यजमानांचा निम्मा जीव जातो. 'जेवणात विविधता हवी' ह्या नावाखाली विविध प्रकारचे पदार्थ बनवले जातात. त्यातून, तसंच बफे पद्धतीनं अन्नाची खूप नासाडी होते. 'अमक्यांनी आपल्या मुलीच्या लग्नात इतके लाख रुपये खर्च केले' ह्यावरून समाजातली त्यांची प्रतिष्ठा ठरते. हे सगळं प्रकरण दिवसेदिवस अत्यंत चीड आणणारं बनत चाललं आहे. मग, समाजात मान राहावा म्हणून 'कर्ज काढून का होईना, पण लग्न थाटामाटातच करायचं' ही प्रवृत्ती वाढत चालली आहे.

आपल्या मुलीचं किंवा मुलाचं लग्न ही खरं तर एक आनंदाची बाब असायला हवी. पण, ह्या फालतू गोष्टींमुळे ती एक व्यथा बनून जाते. ह्यात दोष कोणाला द्यायचा?—समाजाचा? की, समाजाचं हे ओझं स्वीकारून पाळणाऱ्या लोकांना? पण, दोष देऊनही उपयोग काय? ही गोष्ट विचारांची आहे. तेच इतके बदलले, भरकटले आहेत की, त्यांना रुळावर कोण आणि कसं आणणार? त्याला टोचणीचीच आवश्यकता आहे आणि ती तुम्ही ह्या मासिकातून देताय ह्याबद्दल मन:पूर्वक आभार. अर्थात हे सर्व वाचून रजिस्टर पद्धतीने लग्न करण्याच्या माझ्या निर्णयाला पुष्टीच मिळाली आहे.

*—हर्षदा ताम्हनकर, पुणे*

---

### प्रयत्न साध्या समारंभांचे

**अजित व अबिदा परब, वेंगुर्ले**

आमचा प्रेमविवाह, त्यातून आंतर-धर्मीय. त्यामुळे प्रत्यक्ष लग्नात जो गाजावाजा व्हायचा, तो लग्नापूर्वी घरात आणि नंतर घराबाहेर असा चांगलाच झाला. आमचे कार्य सिद्धीस जाऊ नये असे बहुतेकांचे विचार पाहिल्यावर तीन मित्रांच्या साक्षीने विवाह नोंदणीकृत केला. त्यामुळे उधळपट्टी-मेजवान्यांचा प्रश्नच आला नाही. नात्यांमधील कटुता अल्पजीवी ठरली, आणि साधारण वर्षभरातच 'आता लग्नाची मोठी पार्टी होऊन जाऊ दे' अशी मागणी नातलग व मित्रांकडून होऊ लागली. तथापि, स्वत:च्या विचारांशी प्रामाणिक राहिल्याने आजतागायत ५ वर्षे ना कोणताही मोठा समारंभ झाला, ना भेटवस्तू स्वीकारल्या.

लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला जवळच्या नातेवाईकांना आयत्या वेळीं निमंत्रित केले. आमच्याकडील घरबांधणी-कामगारांकडूनच जेवण बनवून घेतले व पुष्कळ मजा केली.

दोन वर्षांपूर्वी गृहप्रवेशाच्या वेळीही छोटासाच समारंभ केला. घरबांधणीसाठी ज्यांनी श्रम घेतले, अशांनाच प्रामुख्याने बोलावले. कोणतीही भेटवस्तू स्वीकारली नाही. किंबहुना, त्याही पुढे एक पाऊल टाकून आमच्या दुकानातील शोभेच्या भेटवस्तूंची विक्री पूर्णपणे बंद केली.

ह्यातून मिळालेला आनंद व निसर्गाचे आशीर्वाद आमच्यासाठी जास्त मौल्यवान आहेत. ☯

*(समाप्त)*

**स्त्री आणि पर्यावरण...** (पृष्ठ ३ वरून)

होऊन त्यांच्या सामाजिक दर्जावर वाईट परिणाम झाला. आधुनिकीकरणाच्या नावाखाली रासायनिक खते आणि कीटकनाशकांमुळे जमिनींचा उपजाऊपणा कमी झाल्यामुळे कुटुंबाचे पोट भरण्याची जबाबदारी असणाऱ्या स्त्रीवर संकट आले. नगदी पिकांच्या आकर्षणामुळेही स्त्रियांचे सामाजिक मूल्य घटले. पाण्याशी असणारे स्त्रियांचे नाते तर अधिक मूलभूत आहे. कुटुंबासाठी पाणी वाहून आणणे आणि त्याचे योग्य व्यवस्थापन करणे ह्या दोन्हींची जबाबदारी स्त्रीवरच असते. आजच्या काळातल्या सिंचनाच्या चुकीच्या व्यवस्था; विविध कारणांसाठी होणारा प्रचंड उपसा; त्यामुळे घटणारी पाण्याची पातळी आणि कोरडे पडत चाललेले पारंपरिक जलस्त्रोत ह्या सगळ्यांचा ग्रामीण स्त्रीच्या दैनंदिन जीवनावर फारच विपरीत परिणाम झाला आहे. स्त्रियांचा पाण्याशी घनिष्ठ संबंध असल्यामुळेच अनेक ठिकाणी पाणीप्रश्नावर स्त्रियांनी एकत्र येऊन अनेक चांगली कामे आणि आंदोलने केली आहेत. ओरिसातील आदिवासी महिला बुधवा हिने आपल्या व आसपासच्या गावातल्या महिलांच्या मदतीने टेकडीवरचे जंगल पुन्हा हिरवे केले. मध्य प्रदेशातील संताबाईने गावातली गाळाने भरलेली तळी आणि तलाव गाळ काढून पुन्हा जिवंत केली. गुजरातमधल्या शांताबेनने बायकांची संघटना तयार करून लहान चेकडॅम्स बांधले; जुने तलाव परत जिवंत केले आणि सौर पंप मिळवून अनेक गावांना पाणी मिळवून दिले. अशी अनेक उदाहरणे लेखिकेने पुस्तकात दिली आहेत. जंगले हा सुद्धा ग्रामीण स्त्रीच्या जीवनाचा मुख्य मूलाधार आहे. अन्न, सरपण, चारा, औषधे आणि उपजिविकेसाठीची इतर उत्पादने ह्यांसाठी स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणावर जंगलावर अवलंबून असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या जंगलतोडीची झळही प्रामुख्याने स्त्रियांनाच मोठ्या प्रमाणात पोचते. त्यामुळे जल-जंगल-जमीन ह्यांच्याशी निगडित प्रश्नांवर काम करताना स्त्रियांचा सक्रिय सहभाग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

तिसऱ्या विभागात पर्यावरण-रक्षण आणि -संवर्धन ह्यांसाठी वैयक्तिक किंवा संस्थात्मक स्वरूपात कार्य करणाऱ्या काही स्त्रियांचा परिचय करून दिलेला आहे. ह्यात वने आणि वनवासींच्या हक्कांसाठी लढणाऱ्या सी. के. जानू; स्त्री, परंपरा आणि पर्यावरण ह्यांची सांगड घालणाऱ्या वंदना शिवा; पर्यावरणविरोधी शासकीय निर्णयांविरुद्ध चळवळ उभारणाऱ्या विचारवंत संशोधिका सुनीता नारायण ह्यांच्या कामांचा सविस्तर परिचय आहे; तर, दुर्गम पहाडी भागातल्या स्त्रिया आणि पर्यावरण ह्यांचे रक्षण करू पाहणाऱ्या गांधीवादी विचारसरणीच्या राधा भट्ट; आंध्र प्रदेशातल्या आदि-वासींच्या सर्वांगीण विकासाचे काम करणाऱ्या नफिसा डिसूझा; नर्मदा बचाव आंदोलनाच्या संस्थापिका आणि सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर; गुजरातेतल्या भूज जिल्ह्यात स्त्रियांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या सुषमा अय्यंगार; निसर्गरक्षण, त्यासाठीचे संशोधन आणि ठिकठिकाणच्या स्थानिक समूहांची क्षमताबांधणी असे काम करणाऱ्या अर्चना गोडबोले, इ.च्या कामांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

भारतीय परंपरा, स्त्री आणि पर्यावरण ह्यांच्या सखोल संशोधनात्मक अभ्यासातून साकार झालेले हे पुस्तक सर्वार्थाने उत्कृष्ट आहे. त्याला छाया दातार ह्यांची विश्लेषक प्रस्तावना आहे. गिरीश सहस्त्रबुद्धे ह्यांनी साकारलेले मुखपृष्ठ उत्तम आणि विषयाला साजेसे आहे. स्त्रीवादी आणि पर्यावरणवादी अशा दोन्ही प्रकारच्या कार्यकर्त्यांना आणि विचारवंतांना योग्य दिशा दाखवणारे हे पुस्तक आहे.

*—पौर्णिमा कुलकर्णी*

---

*प्रकाशक : पद्मगंधा प्रकाशन.*
*पृष्ठे : १७२; किंमत : रु.१८०/–*

## ग.सं.वार्ता

❑ **पुण्यातलं निसर्गायण शिबिर :** गेली २ वर्षं ‘जीविधा’ ही संस्था पुण्यात निसर्गायण शिबिर आयोजित करत आहे. यंदाही असं शिबिर २४ ऑगस्टला आयोजिलं गेलं. दिलीप आणि पौर्णिमा कुलकर्णी ह्यांनी विविध व्याख्यानांतून पर्यावरणाच्या समस्या, विकास-संकल्पना, ऊर्जा-तंत्रज्ञान, शारीरिक-मानसिक स्वास्थ, पर्यावरणस्नेही विकासनीती, निसर्गस्नेही जीवनशैली, इ. विषय मांडले. ह्या शिबिरात पुणे आणि परिसरातील ६० जण सहभागी झाले होते.

❑ ग.सं.च्या वाचकांतून कृतिगट तयार व्हावेत ह्या हेतूनं पुण्यात ऑगस्टमध्ये एक बैठक घेण्याचा विचार होता. ज्यांनी तीत सहभागी होण्याची इच्छा प्रदर्शित केली होती, अशांची एक बैठक २३ ऑगस्टला ‘ग्रामायन’च्या कार्यालयात झाली. तिला ११ जण उपस्थित होते. देवदत्त पाटणकर ह्यांनी ‘कोथरूड सिटिझन्स फोरम’च्या वतीनं कचरा-व्यवस्थापनाबाबत चालू असलेल्या यशस्वी उपक्रमाची माहिती दिली. अलका मेहेंदळे ह्यांनी शाळांत व्याख्याने ह्या उपक्रमाबाबत; तर, राजेश शेंडकरांनी पुस्तक-विक्रीच्या उपक्रमासाठी पुढाकार घेण्याचं ठरवलं. प्रा. शर्मिष्ठा खेर ह्यांनी महाविद्यालयांच्या कॅंटिनांमधील कचऱ्याचं व्यवस्थापन हा मुद्दा पुढे मांडला.

ज्या वाचकांना अशा कामांत रस असेल, त्यांनी आपलं नाव, पत्ता आणि भ्रमणभाष-क्रमांक अनिल काळे ह्यांना कळवावा ही विनंती. त्यांचा क्रमांक आहे : ९९२२९-३९८९१.

### निसर्गायण शिबिरांचं आयोजन

ग.सं.चे वाचक किंवा स्थानिक कार्यकर्ते/संस्था ह्यांच्या पुढाकारातून आणि सहकार्यानं ठिकठिकाणी निसर्गायण शिबिरं आयोजिली जातात. सामान्यत: नोव्हेंबर ते मार्च ह्या काळात ही शिबिरं होतात. अशी शिबिरं आपल्या गावात आयोजित करण्याची ज्यांची इच्छा असेल, अशांनी कृपया कुडावळ्यास पत्र पाठवावं. अशा शिबिरांचं आयोजन अत्यंत सोपं असतं. एखादं सभागृह वा शाळा/महाविद्यालयाचा वर्ग आरक्षित करणं, वृत्तपत्रांत निवेदन देणं, आणि नावनोंदणी करून घेणं एवढीच कामं असतात. शिबिराचं कोणतंही मानधन वा प्रवासखर्च आम्ही घेत नाही; त्यामुळे चहा, नाश्ता, जेवण आणि सभागृहाचं भाडं एवढा खर्च भागवण्यापुरतं शुल्क ठेवून भागतं. शिबिरार्थी आपापले डबे घेऊन आल्यास भोजनव्यवस्थेचं कामही कमी होतं. त्यामुळे ग.सं.च्या २-३ वाचकांना मिळून असं शिबिर आपल्या गावीं भरवणं सहज शक्य आहे. ठिकठिकाणचे वाचक असा पुढाकार घेऊन शिबिरं आयोजतील अशी आशा आहे. *—दि.कु.*

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

## हिरवं वाचन

### अजित बर्जे

प्राचीन काळापासून देवराई वा परिसरातील वने ही मनुष्याच्या जीवनातील एक अविभाज्य घटक असल्याचे दाखले आहेत. अगदी कालिदासाच्या ‘विक्रमोर्वशीयम्’मध्येही ह्याचा उल्लेख आढळतो. जेव्हा माणसाचे व्यवहार सर्वस्वी त्याच्या भोवतालच्या नैसर्गिक परिसंस्थेवरच अवलंबून होते, तेव्हा त्याचा निसर्गाविषयीचा कृतज्ञभाव वादातीत होता. आता तो कमी कमी होत जाऊन इको टूरिझम ह्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे! आपल्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्ट निसर्गातूनच येते हे वास्तव त्याने सपशेल दृष्टिआड केले आहे.

‘टेराग्रीन’ मासिकाच्या मे २०१४च्या अंकामध्ये ‘द डिसक्वाएटेड वुड्स् : द स्टेपचाईल्ड ऑफ एन्व्हायरॉन्मेंटल इश्शूज’ ह्या लेखामधून देवरायांविषयी माहिती मिळते. ऋग्वेदापासून ते चाणक्यापर्यंत जसे त्यांविषयी उल्लेख सापडतात, तसेच अनेक कथा व पुराणांमध्येही त्यांचे संदर्भ आढळतात. ‘देवाच्या नावाने राखलेले वन’ असा धार्मिक संदर्भ जरी ह्या संकल्पनेमागे असला, तरी त्यामागील दृष्टिकोण अतिशय व्यापक होता. मूलत: ज्या निसर्गाच्या साथीने जीवन जगायचे आहे, त्याबद्दल कृतज्ञ राहून, ते नष्ट होणार नाही ह्याबद्दल दक्षता घेणे हे परंपरेतून आलेले शहाणपण त्यामागे निश्चित होते. देवरायांची भारतात जशी परंपरा आहे, तशी ती ग्रीक, रोमन, आफ्रिकी व इतर अनेक सभ्यतांमध्येही आढळून येते.

भारतातील देवरायांची अधिकृत गणना जरी झालेली नसली, तरी हिमालयाच्या पायथ्याकडील प्रदेशापासून केरळापर्यंत संपूर्ण भारतात मिळून एक ते दीड लाख देवराया आजही अस्तित्वात असल्याचा अंदाज ह्या लेखात व्यक्त केलेला आहे. प्रत्येक देवराई ही स्थानिक देव-देवता, सर्प-प्राणी ह्यांपासून ते शैव-वैष्णवपंथीय देवदेवतांच्या नावाने राखल्याचे दिसून येते. ह्या देवरायांची मालकी जशी सामायिक वा गावाची असते, तशीच ती देवस्थानाची वा विशिष्ट समूहाचीही असते. काही ठिकाणी तर ती कुटुंबाची देखील असते. महाराष्ट्रात बहुतेक देवराया वन वा महसूल खाते ह्यांच्या अखत्यारीत येतात; तर उत्तरेकडील काही राज्यांत त्यांचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाकडे आहेत. त्या राखण्यामागे जसे धार्मिक संदर्भ आहेत, तसेच सांस्कृतिक आशयाची गुंफण देखील केली गेलेली आढळते. प्रत्येक भागातील चालीरीती व प्रथांनुसार अनेक आख्यायिका, कथा, आशय व संदर्भ, तसेच विविध उत्सव व कला-विष्कारांतून त्याचे प्रकटीकरण होते. विशेषत: दक्षिणेकडील प्रदेशामध्ये अनेक संस्कार व विधींची सांगड ह्यामध्ये घातलेली दिसते. नृत्य व संगीताच्या माध्यमातून ह्या देवतांचे पूजन व उत्सवही साजरे केले जातात. ह्या सर्व परंपरांविषयीची माहिती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने हस्तांतरित केली जाते.

देवराया जसे स्थानिक निसर्गाचे संवर्धन करतात, तसेच तेथील रहिवाशांना भावनिक दृष्ट्या देखील एकसंध ठेवण्याचे कार्य करतात. प्रत्येक प्रदेशातील परंपरेनुसार ह्या देवरायांचे पावित्र्य टिकवण्याचे नैतिक बंधन प्रत्येक व्यक्तीवर असते. उदाहरणार्थ, काही ठिकाणी केवळ वाळून जमिनीवर पडलेल्या फांद्या/लाकूड स्थानिक लोक वापरतात; तर, काही ठिकाणी ते सुद्धा निषिद्ध असते. कुठलेही गैरकृत्य केले, तर त्या देवतेचा कोप होईल अशी दृढ श्रद्धा प्रत्येकामध्ये असल्याने, कुठलेही लिखित कायदेकानून नसतानाही तेथील पावित्र्य पाळले जाईल ह्याची दक्षता प्रत्येक जण घेतो.

आज सर्वत्र जंगलांचा ऱ्हास होत असताना ह्या व्यवस्थेवरही प्रचंड दबाव आला आहे; पण, केवळ ह्या टिकून राहिलेल्या देवरायांमुळेच अनेक दुर्मीळ वनस्पतींचे अस्तित्व टिकून आहे; तसेच, अनेक वन्यजीव लुप्त होण्यापासून वाचले आहेत. एवढेच नव्हे, तर देवरायांमुळे तेथील भूजलपातळी राखली जाते; धूप होण्यापासून जमिनीचा बचाव होतो; तसेच जैव-साखळीतून निर्माण होणाऱ्या पोषक द्रव्यांतून त्या परिसरातील शेतीला फायदा होतो.

आज एकूणच निसर्गाप्रति मानवाची जी बेपर्वा वृत्ती दिसून येते, ती केवळ काही दशकांपूर्वीचा इतिहास पाहिला, तर तशी नव्हती. अनादि काळापासूनचा प्रकृतीबद्दलचा भितियुक्त आदर प्रगतीच्या टप्प्यात काही प्रमाणात कमी होत गेला असला, तरी वसाहतवाद सुरू होण्यापूर्वी तो टिकून होता. जंगले, तसेच नैसर्गिक संसाधनांचे इंग्रजांनी सरकारीकरण सुरू केल्यापासून प्रजेची नाळ निसर्गापासून हळूहळू तुटत जाऊन उद्योगीकरण व शहरीकरणामुळे ते बंध कायमचे तुटले. लोकांच्या सामाजिक व धार्मिक संकल्पना बदलल्या; गावकुसातल्या दगडधोंड्यांतल्या श्रद्धेची जागा हळूहळू कॉंक्रीट व संगमरवरी मंदिरे व देवस्थानांनी प्राप्त केली. निसर्गाशी असलेले नाते फक्त तेथील साधनसंपत्तीच्या वापरापुरते मर्यादित राहिले. माणसाची अति हाव निसर्गवीण उद्ध्वस्त करत असल्याची जाणीव विचारवंतांना झाल्यावर विविध स्तरांवर देवरायांचा अभ्यास नव्याने सुरू झाला व त्याच्या माध्यमातून होणारे जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन, परंपरेतून झिरपत आलेले निसर्गज्ञान, विकेंद्रित व छोट्या-छोट्या क्षेत्रांमधून जपला जाऊ शकणारा निसर्गठेवा ह्यांची आधुनिक व्यवस्थापनाशी सांगड घातली गेली. त्यातून देवरायांचे महत्त्व अधोरेखित झाले.

ह्या परंपरेचे रक्षण करणारे आदिवासी, वनवासी व ग्रामस्थ ह्यांचे महत्त्व ओळखून त्यांना वनाधिकार देणे; विविध माध्यमांतून उपजिविकेचे साधन, तसेच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, व ह्या परंपरेची जपणूक करणे ह्याला आता महत्त्व दिले जाऊ लागले आहे. ह्या दृष्टीने केरळ शासनाने २००७ साली राज्याचे वनधोरण निश्चित करून देशात आघाडी घेतली आहे. त्यामध्ये देवरायांबरोबरच पाणथळ क्षेत्रे, सागरी किनारे, खारफुटीची जंगले, नद्यांची खोरी ह्यांनाही संरक्षण दिले गेले आहे. अशा कायदेशीर बाबींबरोबरच लोकशिक्षणातून त्याचे महत्त्व समजावून जागृती केली गेली, तरच देवरायांची व त्या माध्यमातून निसर्गाची जपणूक होऊ शकेल. ह्या विषयीची विस्तृत माहिती Community Conserved Areas in India ह्या ग्रंथात (प्रकाशक : कल्पवृक्ष) उपलब्ध आहे. ☯

***छापील अंकाच्या वर्गणीदारांना ई-अंक विनामूल्य मिळतो. आपला ई-पत्ता कळवा.***

**सौर दिनदर्शिका** — **सौर आश्विन, शके १९३६ (सप्टेंबर-ऑक्टोबर २०१४)**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १<br>सप्टेंबर 23 | २<br>24 | ३<br>25 | ४<br>26 | ५<br>27 |
| ६<br>28 | ७<br>29 | ८<br>30 | ९<br>1 | १०<br>2 | ११<br>3 | १२<br>4 |
| १३<br>5 | १४<br>6 | १५<br>7 | १६<br>8 | १७<br>9 | १८<br>10 | १९<br>11 |
| २०<br>12 | २१<br>13 | २२<br>14 | २३<br>15 | २४<br>16 | २५<br>17 | २६<br>18 |
| २७<br>19 | २८<br>20 | २९<br>21 | ३०<br>22 ऑक्टोबर | | | |

**सौर दिनदर्शिका** — **सौर कार्तिक, शके १९३६ (ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४)**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १<br>ऑक्टोबर 23 | २<br>24 | ३<br>25 |
| ४<br>26 | ५<br>27 | ६<br>28 | ७<br>29 | ८<br>30 | ९<br>31 | १०<br>1 |
| ११<br>2 | १२<br>3 | १३<br>4 | १४<br>5 | १५<br>6 | १६<br>7 | १७<br>8 |
| १८<br>9 | १९<br>10 | २०<br>11 | २१<br>12 | २२<br>13 | २३<br>14 | २४<br>15 |
| २५<br>16 | २६<br>17 | २७<br>18 | २८<br>19 | २९<br>20 | ३०<br>21 नोव्हेंबर | |

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले.
संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)**

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३०
डाकघरातून; दरमहा दि.२१ला

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2012-14
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना क्र. : WPP-13

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिट्ठीवरचा कालावधी **सप्टें.१४** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा. ↓

पावती क्रमांक — कालावधी पर्यंत

**प्रति**

**प्रेषक** : गतिमान संतुलन,
कुडावळे ४१५७१२,
ता. दापोली, जि. रत्नागिरी



पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002